आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२६ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघांमधे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५३ टक्क्यापेक्षा जास्त मतदान

- पाचव्या टप्प्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये अर्ज भरायला सुरुवात

- सर्व VVPAT पावत्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६०९ अंकाची घसरण

**<><><><><>**

**हिंगोली, वाशिम, यवतमाळ, वर्ध्या, बुलडाण्यामध्ये** अनेक वधु वरांनी लग्नगाठ बांधण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला आणि इतरांनाही मतदानाचं आवाहन केलं. शेगावमध्ये एका नवरदेवानं वऱ्हाडासह मतदान केलं.

**अकोल्यात** एका खानावळीनं मतदान केलेल्यांना ५० टक्के सूट देण्याचा निर्णय जाहीर केला. अकोल्यातच एक डॉक्टर मतदान केलेल्यांना उष्माघात प्रतिबंधक औषधं मोफत देत आहे. शहरातल्या एका सलूनमध्ये मतदान करणाऱ्यांना मोफत कटींग करुन दिली जात आहे. शिक्षणानिमित्त सिंगापूरमध्ये असणाऱ्या एका युवा मतदारानं आज अकोल्यात येऊन मतदान केलं. तो म्हणाला.

**होल्ड बाइट - अकोला-- (१२ सेंकद)**

**नांदेड** दक्षिण मतदार संघात विष्णुपुरी इथं आज पर्यावरणपूरक मतदान केंद्र स्थापन केलं होतं. या मतदान केंद्रावरच्या सुविधांबाबत मतदारांनी समाधान व्यक्त केलं. नांदेडमध्ये गुजराथी हायस्कूलमधल्या महिला कर्मचाऱ्यांद्वारे संचलित मतदान केंद्रावर फूल देऊन कर्मचाऱ्यांनी मतदारांचे स्वागत केलं.

**यवतमाळ**मध्ये एका मतदान केंद्रावर दिव्यांग बांधवांनी झाडाचं रोप देऊन मतदारांचं स्वागत केलं.

**वाशिम** जिल्ह्यातल्या चेतन सेवांकुरच्या दृष्टीबाधित दिव्यांग मतदारांनी ब्रेल चिठ्ठी आणि सहायकाच्या मदतीनं आयुष्यात पहिल्यांदाच मतदान केलं. वाशिम नगरपालिकेच्या घंटागाडीनं मतदारांना मतदानासाठी बाहेर पडण्याचं आवाहन केलं.

**हिंगोली** जिल्ह्यात वसमत इथं ९० वर्षांच्या एका महिलेनं आज मतदान केंद्रावर जाऊन आपलं मतदानाचं कर्तव्य बजावलं.
परभणीत जिल्हा पॅथॉलॉजी लॅब असोसिएशन मतदान करणाऱ्यांना २ दिवस रक्त तपासणीमध्ये ३० टक्के सूट देणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ५३ पूर्णांक ५१ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. सर्वाधिक ५६ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान वर्ध्यात झालं. सर्वात कमी ५२ टक्के मतदानाची नोंद हिंगोलीत झाली. यवतमाळ-वाशिम, परभणी, अमरावती मध्ये सुमारे ५४ टक्के तर अकोला, बुलडाणा आणि नांदेडमध्ये ५२ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या आजच्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष कार्यक्रम 'मतदानाचा मागोवा' आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर आज रात्री सव्वा आठ पासून ऐकता येईल.

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या आजच्या भागात संध्याकाळी सव्वा ७ वाजता कोल्हापूर आणि हातकंणगले लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकता येईल.

**<><><><><>**

**हिंगोली** लोकसभा मतदार संघात ३९ मतदान केंद्रांवरच्या मतदान यंत्रांमध्ये बिघाड झाल्यानं मतदान प्रक्रियेला अडथळा निर्माण झाला. मात्र, त्या ठिकाणी तांत्रिक बिघाड दूर करण्यात आल्यावर, तर एका ठिकाणी मतदान यंत्र बदलल्यानंतर मतदान प्रक्रिया सुरळीत झाल्याची माहिती प्रशासनानं दिली.

**परभणी**त २० ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाल्यानं ते बदलण्यात आले.

**वर्धा, अकोला** मतदार संघात मतदानयंत्रात बिघाड झाल्यानं मतदान प्रक्रिया थांबल्याचं वृत्त होतं. त्यावर जिल्हा प्रशासनानं तातडीनं कारवाई करत मतदान सुरळीत सुरू केलं.

**नांदेड** मतदार संघातल्या बिलोली तालुक्यात रामतीर्थ इथं एका युवकानं मतदान केंद्रातलं मतदान यंत्र फोडलं. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आहे. या मशीनमधला डेटा सुरक्षित असून त्याठिकाणी दुसरं ईव्हीएम तत्काळ पोहोचविल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**यवतमाळमध्ये** मतदारांच्या बोटाला शाई लावून पैशाचं वाटप करुन त्यांना मतदानापासून वंचित ठेवलं जात होत असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब

ठाकरे पक्षाचे संपर्क प्रमुख राजेंद्र गायकवाड यांनी केला होता. याठिकाणी भरारी पथकाला काही नावं लिहीलेली नोंदवही सापडली. याबद्दल अज्ञाताविरोधात प्राथमिक तपास अहवाल लिहीला जात असून रोख रक्कम आढळून आली नसल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

**<><><><><>**

समाजातल्या प्रत्येक घटकाला घेऊन प्रधानमंत्री नरेंद्र या वेळचं मतदान हे भाजपासाठी नसून, भारताला सर्वोच्च पदावर पोहोचवण्यासाठी असल्याचं भाजपाचे स्टार प्रचारक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूरमध्ये नारायण राणे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत बोलत होते.मोदी पुढे जात आहेत. मोदीजींच्या भारताकडे पाहून जगाला आशा वाटते, म्हणूनच देशात गुंतवणूक येत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

फडनवीस यांनी आज **पेण मध्ये** देखील महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या प्रचारसभेला संबोधित केलं. आगामी निवडणूक ही देश कोणाच्या हाती सुरक्षित राहील, आणि येणाऱ्या पिढ्यांचं भविष्य कोण घडवू शकेल याचा फैसला करणारी असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

सर्व ‘VVPAT’, म्हणजेच वोटर व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेलमधल्या सर्व चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या पीठानं हा निर्णय दिला. निवडणूक आयोगानं दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारावर न्यायालयानं आज हा निर्णय दिला.

मात्र, सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला दोन निर्देश दिले. त्यानुसार EVM मध्ये चिन्ह लोड केल्यानंतर, चिन्ह लोडिंग करणारं युनिट सीलबंद करावं आणि कंटेनरमध्ये सुरक्षित करावं. उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी या सील वर स्वाक्षरी करावी. तसंच निकाल जाहीर झाल्यानंतर किमान ४५ दिवस ईव्हीएमसह सीलबंद कंटेनर स्टोअर रूममध्ये ठेवावेत. ईव्हीएम प्रमाणेच ते उघडावेत आणि सीलबंद करावेत असं यात म्हटलं आहे. ५ टक्के ईव्हीएममधले burnt memory semicontroller उमेदवारांच्या मागणीनुसार उत्पादकांच्या अभियंत्यांनी तपासावं, असं दुसऱ्या निर्देशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

निवडणूक आचारसंहिता भंग प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना क्लीन चिट मिळाली आहे. त्यांनी इंदापूरमध्ये आयोजित एका सभेत निधी वाटपाबाबत वक्तव्य केलं होतं. त्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं तक्रार दाखल केली होती.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली. या मतदारसंघात इच्छुकांना ३ मे पर्यंत अर्ज भरता येतील. यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह देशातल्या एकूण ४९ मतदारसंघांचा समावेश आहे. त्यात मुंबईतले सर्व ६ मतदारसंघ, **ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे** या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

ईशान्य **मुंबईतले** भाजपा उमेदवार मिहिर कोटेचा यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अर्ज भरला. तसंच सुक्ष्मा मौर्य या अपक्ष उमेदवारानंही आज अर्ज भरला. दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, उत्तर मुंबई,

वायव्य मुंबई, उत्तर-मध्य मुंबई मतदारसंघातून एकाही उमेदवारानं अर्ज भरलेला नाही.

**नाशिक** लोकसभा मतदारसंघातून बाबाजी भक्त परीवाराचे शांतीगिरी महाराज यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. दिंडोरीतून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी आमदार जीवा पांडू गावित आणि सुभाष रामू चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. या मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं भास्कर भगरे यांना उमेदवारी दिली आहे. या मतदार संघातली उमेदवारी त्यांनी मागे घ्यावी अन्यथा मैत्रीपूर्ण लढतीसाठी सज्ज राहावं असं गावीत यांचा अर्ज दाखल केल्यानंतर माकपचे ज्येष्ठ नेते डॉ. डी. एल कराड यांनी सांगितलं.

**पालघरमधून** बहुजन विकास आघाडीचे उमेदवार म्हणून राजेश पाटील यांनी आज अर्ज भरला.

**कल्याण** लोकसभा मतदारसंघात आज सुशिला कांबळे आणि अमित उपाध्याय यांनी अर्ज जमा केले.

**ठाण्यातून** आज एकही अर्ज आला नसला तरी २५ उमेदवारांनी ४३ अर्ज विकत घेतले. भिवंडीतूनही आज एकाही उमेदवाराने अर्ज भरला नसला तरी २५ जणांनी ५४ अर्ज विकत घेतले.

**<><><><><>**

सोलापूर शहरामध्ये सात वर्षांपूर्वी झालेल्या आबा कांबळे खून खटल्यातल्या सर्व सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा न्यायलयाने सुनावली आहे. जिल्हा विशेष न्यायाधीश संगीता शिंदे यांनी आज हा निकाल दिला.
वैयक्तिक शत्रुत्वातून हा खून झाला होता.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या जेईई मेन्समध्ये वाशिम जिल्ह्यातला नीलकृष्ण गजरे हा तीनशेपैकी तीनशे गुण मिळवून देशात पहिला आला आहे. शेगावच्या बुरुंगले महाविद्यालयात शिकणारा नीलकृष्ण वाशिम जिल्ह्यातल्या बेलखेडमधला असून त्याचे वडिल शेतकरी आहेत. आपल्या यशाबद्दल सांगताना तो म्हणाला.

**होल्ड ... बाईट...(१५ सेंकद)**

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज झाली. उमेदवारी मागं घेण्याची मुदत येत्या २९ एप्रिल पर्यंत आहे. या टप्प्यात राज्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, बीड, जालना, पुणे, शिरूर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, आणि औरंगाबाद या ११ मतदारसंघातलं मतदान येत्या १३ मे रोजी होणार आहे.

**बीड** मतदारसंघात ७६ उमेदवारांनी ९९ अर्ज दाखल केले होते. त्यातले ५५ अर्ज हे वैध ठरल्याची माहिती जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

**जालना** मतदारसंघात एकूण ४७ उमेदवारांनी ६८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. छाननी प्रक्रियेत १२ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**नंदुरबार**मधे भाजपा उमेदवारानं काँग्रेच्या उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जावर हरकत घेतली होती मात्र पूर्ण सुनावणी केल्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी हरकत फेटाळली.

**<><><><><>**

गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील महाविकास आघाडीचे उमेदवार नामदेव किरसान यांच्याबद्दल बदनामीकारक मजकूर प्रकाशित केल्याप्रकरणी भाजप नेते नामदेव उसेंडी आणि नितीन कोडवते यांच्यावर आचारसंहिताभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. नामदेव किरसान यांनी केलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

<><><><>

लोकसभेच्या निवडणुकीचा दुसरा टप्पा होत असताना भारतीय जनता पक्ष आणि  त्यांच्या मित्रपक्षांची घाबरगुंडी उडाली आहे, त्यामुळे ते  काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर, खालच्या पातळीवर येऊन टीका करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. राहुल गांधी यांनी पदयात्रा काढून संपूर्ण भारत देश पिंजून काढला आहे. त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे त्यांच्यावर टीका होत आहे, असं त्यांनी आज काँग्रेसनं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्स मधे आज ६०९ अंकाची घट झाली आणि तो ७३ हजार ७३० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५० अंकांच्या घसरणीसह २२ हजार ४१९ अंकांवर बंद झाला.

<><><><>

मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सेतू यांना जोडणाऱ्या गर्डरची आज पहाटे यशस्वीपणे स्थापना करण्यात आली. समुद्रातल्या भरती-ओहोटीचा वापर करून गर्डरच्या मदतीने दोन सागरी मार्ग जोडण्याचा देशातला हा पहिलाच प्रयोग आहे.

<><><><>

मतदानाच्या पुढच्या टप्प्यातल्या उमेदवारांसाठी राजकीय पक्षांचे जेष्ठ नेते प्रचारसभा घेत आहेत. पश्चिम बंगालमधल्या मालदा इथं प्रधानमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज सभा झाली. तुष्टीकरणाचं राजकारण करण्यात काँग्रेस आणि तृणमूल सारखेच आहेत अशी टीका मोदी यांनी यावेळी केली. भाजपाने देशाच्या संरक्षणासाठी घेतलेला प्रत्येक निर्णय हे पक्ष बदलतील असंही ते म्हणाले. बंगाल हा एकेकाळी देशाच्या विकासात अग्रभागी होता. मात्र आधी डावे पक्ष आणि नंतर तृणमूल यांच्या कार्यकाळात पश्चिम बंगालचं खच्चीकरण केलं गेलं आणि विकास थांबवला असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

शांघाय सहकार्य संस्थेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये विकास घडवून आणायचा असेल तर कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला किंचितही थारा देता कामा नये, असं संरक्षण सचिव गिरीधर आरमाने यांनी म्हटलं आहे. कझागस्थान इथे आयोजित सर्व सदस्य राष्ट्रांच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेत बोलताना त्यांनी याची गरज व्यक्त केली. संस्थेच्या कार्यक्षेत्रात शांतता,स्थिरता,सुरक्षा राखण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. यावेळी ‘एक वसुंधरा,एक कुटुंब,एक भविष्य’ ही संकल्पना विकसित करण्यावर सर्व संरक्षण मंत्र्यांचं एकमत झालं.ही संकल्पना भारताच्या ‘वसुधैव कुटुम्बकम’ या प्राचीन तत्वज्ञानाशी साम्य दर्शवणारी आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईय रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. कोलकाता इथल्या हिडन गार्डन्स मैदानावर

थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण वगळता राज्याच्या उर्वरित भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. यावेळी सोसाट्याचे वारे वाहतील. कोकणात उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून, त्यानंतर पुढले दोन दिवस तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**